सामना

# प्राण्यांवरील क्रूरतेच्या गुन्ह्यांत आता कठोर कारवाई होणार

**मानवी हक्क आयोगाचा राज्याच्या गृह विभागाला झटका**

मुंबई, दि. ४ (प्रतिनिधी) – राज्यात प्राणी संरक्षण कायदा करण्यात आला, मात्र त्याच्या अंमलबजावणीसाठी नियम बनवले नाहीत. यासंदर्भात राज्य मानवी हक्क आयोगाने झटका देताच गृह विभागाने प्राण्यांवरील क्रूरता रोखण्याच्या हेतूने सुधारित प्रमाणित कार्यपद्धती (एसओपी) जारी केली आहे. त्यानुसार यापुढे प्राण्यांवरील क्रूरतेच्या तक्रारींची गंभीर दखल घेऊन अशा गुन्ह्यांत कठोर कारवाई केली जाणार आहे.

घाटकोपर येथील आशीष बारीक यांनी ॲड. सिद्ध विद्या आणि ॲड. सुनीता राय यांच्यामार्फत राज्य मानवी हक्क आयोगाकडे तक्रार केली होती. प्राणी संवर्धन कायद्यांतर्गत नियमच बनवलेले नाहीत. त्यामुळे प्राण्यांची तस्करी तसेच इतर क्रूरतेच्या गुन्ह्यांत कारवाई करताना कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होतो. या पार्श्वभूमीवर नियम वा एसओपी जारी करण्याबाबत निर्देश द्या, अशी मागणी तक्रारदार बारीक यांनी केली होती. त्यांच्या तक्रारीवर आयोगाचे अध्यक्ष न्यायमूर्ती के. के. तातेड आणि सदस्य एम. ए. सय्यद यांच्यापुढे सुनावणी झाली. गृह विभागाने प्राणी क्रूरतेच्या प्रकरणांत आपला संबंध नसल्याचे सांगून अधिकार क्षेत्राच्या मुद्द्यावर जबाबदारी झटकण्याचा प्रयत्न केला. त्यावर तक्रारदाराच्या वकिलांनी जोरदार आक्षेप घेताच आयोगाने गृह विभागाच्या कारभारावर ताशेरे ओढले. त्यामुळे हादरलेल्या गृह विभागाने अखेर परिपत्रकाद्वारे एसओपी जारी केली. पोलीस महासंचालक कार्यालयातील विधी अधिकाऱ्यांनी या एसओपीसंबंधी राज्यभरातील सर्व पोलीस ठाण्यांना सूचना दिल्या आहेत.

### कायद्याच्या जनजागृतीपर पोलिसांकरिता कार्यशाळा

महाराष्ट्र प्राणी संरक्षण कायदा, १९७६ (सुधारित १९९५) व प्राण्यांना निर्दयतेने वागवण्यास प्रतिबंध अधिनियम, १९६० मधील तरतुदी तसेच नियमांची पोलीस अधिकारी व अंमलदारांना माहिती करून देण्यासाठी जनजागृतीपर नियमित कार्यशाळांचे आयोजन करणे, असेही गृह विभागाच्या परिपत्रकात नमूद केले आहे.

### आयोगाच्या निर्देशानुसार गृह विभागाची 'एसओपी'

▪ प्राण्यांवरील क्रूरतेच्या गुन्ह्यांचा तपास संवेदनशील पद्धतीने करून आरोपींविरोधात योग्य कलमे आणि सबळ पुराव्यांनिशी न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करणे ▪ केंद्र सरकारच्या निर्देशानुसार नेमलेले मानद प्राणी अधिकारी तसेच प्राणी मित्र संघटनांकडून प्राप्त होणाऱ्या तक्रारींची गांभीर्याने दखल घेणे ▪ प्राणी तस्करीविरोधात कारवाई करताना पोलिसांवर होणारे हल्ले रोखण्यासाठी पुरेसे मनुष्यबळ पुरवणे. तसेच या कारवाईचे व्हिडिओ रेकॉर्डिंग करणे ▪ पंचनाम्यादरम्यान पशुधन विकास अधिकाऱ्यांना पाचारण करून त्यांच्या मदतीने जप्त केलेल्या मांसाचा नमुना ताब्यात घेणे. त्यासाठी तपासणी किट पुरवणे ▪ जप्त केलेल्या मांसाचा नमुना वेळीच फॉरेन्सिक लॅबमध्ये पाठवावा तसेच संबंधित प्रयोगशाळेकडून लवकरात लवकर अहवाल मिळवून त्या आधारे अतिरिक्त आवश्यक ती कलमे समाविष्ट करणे.

Date - 05-12-2023

Scanned with OKEN Scanner